# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

---

**दिनांक १०.०८.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) गणेशपेठ पोलीसांची कामगीरी :— ऑटोरिक्षातुन चोरी करणाऱ्या आरोपींना अटक. ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०४.०८.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, फिर्यादी श्रीमती पुष्पा लक्ष्मीकांत बागडे वय ६५ वर्ष रा. सावंगी मोहपा, ता. कळमेश्वर जि. नागपूर हया एसटी स्टॅन्ड येथे येऊन पायदळ बैद्यनाथ चौकाकडे जात असता, एका ऑटोरिक्षा चालकाने त्यांना विचारले असता, त्यांनी वसंतनगर येथे जायचे आहे असे म्हटले. ऑटोरिक्षामध्ये आधीच दोन महिला बसलेल्या होत्या. ऑटोरिक्षा चालकाने फिर्यादीस बसवुन त्यांना मेडीकल चौक ते अजनी रोडवर मध्येच खाली उतरवुन निघुन गेला. फिर्यादी या वसंत नगर येथे आईचे घरी गेल्यावर त्यांनी त्यांचेजवळील बॅग पाहिली असता, बॅग फाटलेली दिसुन आली व त्यातील सोन्याचे मंगळसुत्र ६ ग्रम वजनी, कि. ४५,०००/— रु. चे चोरीस गेल्याचे दिसुन आले. ऑटोरिक्षाचालक व दोन महिला आरोपी यांनी चोरी केल्याचे फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपीविरूध्द कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान गणेशपेठ पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे बसस्थानक परिसरात पेट्रोलींग करीत असता, त्यांना एका ऑटोरिक्षामध्ये चालकासह दोन महिला संशयीतरित्या फिरतांना दिसल्याने, ते ऑटोरिक्षाकडे जात असता, चालक हा पळून जाण्याचे प्रयत्नात असतांना त्यांना ताब्यात घेतले. त्यांना पळून जाण्याचे कारण विचारले असता, त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिल्याने, पोलीस ठाणे येथे आणुन त्यांना नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) मोहम्मद इकरान बख्तियार अहमद वय ३० वर्षे, रा. गरीबनवाज नगर, बडे कुवे के पास, यशोधरानगर, नागपुर २) रिना बंटी पात्रे वय ४५ वर्ष ३) किर्ती गोविंद खडसे वय ३६ वर्ष दोन्ही रा. सतरापुर, कन्हान, नागपूर असे सांगितले. त्यांची सखोल विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद चोरीचा गुन्हा केल्याचे कबुल केले. तसेच त्यांनी वरील गुन्हयाव्यतिरिक्त पोलीस ठाणे गणेशपेठ हद्यीत दिनांक ०५.०८.२०२६ रोजी अशाच प्रकारे चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन दोन्ही गुन्ह्यातील मुद्देमाल तसेच गुन्हा करतांना वापरलेला बजाज मॅक्सिमा ऑटोरिक्षा क्र. एमएच ४९ एमआर ९३०४ कि. ३०,०००/— असा एकूण १,०५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्री. रोशन पंडीत, सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अतुल तवाडे, पोनि. गुन्हे टिकाराम थाटकर, सफौ. समिर शेख, पोअं. पवन मालखेडे, वैभव यादव, प्रदीप इटनकर व प्रकाश जाधव यांनी केली.




**२) धंतोली पोलीसांची कामगीरी :— चोरी चे गुन्ह्यातील आरोपीस अटक. ०३ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ०३.०५.२०२६ चे १७.३० वा. ते १७.४५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, अजनी चौक येथील पुष्पम बार ॲण्ड रेस्टॉरेंट येथे मॅनेजर काम करणारा आरोपी नामे सुरज बाबुराव वाढई, वय ३७ वर्षे, रा. टाईप सि/२, सेंट मायकेल स्कुल जवळ, सिव्हील लाईन, रामनगर, चंद्रपुर याने फिर्यादीचे बार काऊंटर मधील रोख ५१,८००/—रू. चोरून नेले. फिर्यादी यांनी सिसिटीव्ही कॅमेरे चेक केले असता, आरोपीने चारेरी केल्याचे दिसुन आले. फिर्यादी प्रकाश देवानंद लारोकर, वय ३५ वर्षे, रा. नंदनवन कॉलोनी, नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे आरोपीविरूध्द कलम ३०६ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, धंतोली पोलीसांनी तांत्रीक तपास करून, आरोपीचा शोध घेवुन, सापळा रचुन त्यास दिनांक ०७.०८.२०२६ रोजी ताब्यात घेवुन, वरील गुन्ह्यात अटक केलेली आहे. आरोपीबाबत माहीती काढली असता, नमुद आरोपीने पोलीस ठाणे नंदनवन तसेच, पो. ठाणे रामनगर जि. चंद्रपुर येथे सुध्दा गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले. व त्या गुन्ह्यात सुध्दा मागील ०८ महीन्यापासुन पाहीजे आरोपी असल्याचे समजले. पोलीसांनी आरोपीकडुन एकुण ०३ गुन्हे उघडकीस आणलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुनिलसिंह पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. साईनाथ रामोड, पोउपनि. शुभम बकाल, पोहवा. योगेश चांभारे, अमोल लोणकर, पोअं. शैलेष गौर, भुवनेश्वर मोहोड, प्रितम मोरे, ऋषभ निशीथकर व विक्की बोहरे यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे हिंगणा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०९.०८.२०२६ चे २०.३० वा. चे सुमारास, फिर्यादी देवसिंग सुखलाल इनवाती वय २७ वर्ष रा. चिखला, पोस्ट बादलपार, जि. शिवनी, मध्यप्रदेश ह.मु. वार्ड क्र. २, डोंगरराव, हिंगणा हे त्यांचे मित्र नामे शंकर देवराव ठाकरे वय ३५ वर्ष रा. वार्ड क्र. २, डोंगरगाव, हिंगणा, जि. नागपूर याचेसह त्याचे मोटार

सायकलने पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, गौसी मानापुर गावाजवळील वर्धेकडे जाणाऱ्या सर्व्हीस रोडवरुन जात असता, त्यांचे मागुन येणाऱ्या अज्ञात ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादी बसलेल्या मोटार सायकलला मागुन धडक देवुन पळुन गेला. फिर्यादी हे जखमी झाले व मित्राचे डोक्यावरुन ट्रकचे चाक गेल्याने ते जागीच मरण पावले. फिर्यादीचा उपचार करण्यात आला.

यासप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे मपोउपनि गायत्री चव्हाण यांनी अज्ञात ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे सदर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १०.०८.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे परिचीत लोको पायलट नामे इंद्रजीत श्यामापद सरकार वय ५१ वर्ष रा. प्लॉट क्र. १, वैभवानंद गृहनिर्माण को—ऑपरेटीव्ह सोसायटी, शंभुनगर, तिरंगा चौक, कोराडी हे त्यांचे बजाज पल्सर मोटार सायकल क्र. एमएच ४९ सी ०४५२ ने डयुटीवर जात असता, पोलीस ठाणे सदर हद्दीत जुना काटोल नाका चौक ते फ्लायओव्हर पुलावर, हल्दीराम हॉटेलचे वर एका पांढरे रंगाची कार क्र. एमएच ३१ डीसी २६३० चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन इंद्रजीत यांचे मोटार सायकलला धडक देवुन पळुन गेला. गंभीर जखमी इंद्रजीत यांना उपचाराकरीता मॅक्स हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी पारितोषकुमार संजयकुमार वय ३५ वर्ष रा. सत्यम गार्डन, लोटस, ३०८, गोधनी रोड, मानकापूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे मसपोनि पाटील ९५९४९५२९२८ यांनी कार चालक आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं., सहकलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** कु. देवांशी विजेश वासनिक, वय १५ वर्षे, रा. प्लॉट नं. १९, मिसाळ ले—आऊट, शिवमंदीर जवळ, जरीपटका, नागपूर ही दिनांक १०.०८.२०२६ चे ०४.५० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लांब. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**<u>२) पोलीस ठाणे अंबाझरी</u> :—** आशिष विजय माथने, वय ३५ वर्षे, रा. प्लॉट नं. ५०८, रजत इन्क्लेव्ह, पुरूषोत्तम मार्केट जवळ, झिंगाबाई टाकळी, नागपूर हे दिनांक ०३.०८.२०२६ चे १४.०० वा. पासुन पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील हेल्थकार्ड प्रोटीन शॉप, लक्ष्मीभवन चौक येथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ९ इंच, केस— काळे लांब, अंगात— पोपटी रंगाची टि—शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात, ओळख— उजव्या हातावर पंखाचे चिन्ह व मानेवर डिझाईन गोंदलेले असुन, सोबत काळ्या रंगाची अॅव्हेंजर दुचाकी आहे.



कु. देवांशी



आशिष

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्रं. ४ नागपूर | ३०८८७८/ २०००८ | कलम २७९, ३३६, ४२६ भादंवि | नितीन निरंजन शंभरकर रा. धरमपेठ, गवळीपुरा, सिताबर्डी, नागपूर गाव नंदुरी ता. समुद्रपुर जि. वर्धा | १७.०८.२०२६ |
| २ | मा. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, १३८ एनआय ॲक्ट कोर्ट नागपूर | ३२८६८६९ /२००५ | १३८ एनआय ॲक्ट | राजश्री अमन हेमानी रा. हिमशिखर अपार्टमेंट, शिवाजी नगर, नागपूर | १४.०८.२०२६ |
| **३.** | मा. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, १३८ एनआय ॲक्ट कोर्ट नागपूर | ३२८४५८४ /२००५ | १३८ एनआय ॲक्ट | राजश्री अमन हेमानी रा. एआर इंडस्ट्रीज, २९०, हनुमान लेन, धरमपेठ, नागपूर | १४.०८.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**